नियमित दिवाणी दावा क्र. ३०/२०२३

वादी तर्फे सा.क्र.१

नि.क्र. ३७

**उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे विधिज्ञ श्री. एस.आर.मगर वकिल यांचेकडून अर्ज निशाणी क्र.४० वरील आदेशान्वये शपथेवर सुरु–**

११. माझे शिक्षण इयत्ता १० वी पर्यंत झालेले आहे. मी कावीळ या आजाराचे औषध लोकांना देतो. मी कावीळ या आजारावर औषधोपचार करण्याकरिता पदवी किंवा पदविका संपादन केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, बेकायदेशीरपणे असे उपचार करतो. मी ज्या जागेवर वास्तव्यास आहे त्याचे मालमत्ता पत्रक माझ्या नावे आहे. मी या दाव्यामध्ये ते मालमत्ता पत्रक दाखल केले नाही. मी ते मालमत्ता पत्रक दाखल करु शकतो. मी दावा मिळकतीचे मालमत्ता पत्रक बघितले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या मालकमत्ता पत्रकामध्ये बाबु राशन्ना यांचे नाव नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ हा बाबु राशन्ना यांचा वारस आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे दावा मिळकत सध्या प्रतिवादी क्र.१ च्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीवर जुने विटा व पत्र्यांचे मोडकळीस आलेले बांधकाम आहे.

१२. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ याने रस्त्यावर अतिक्रमण करुन रहदारीस अडथळा केल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी व इतर रहिवाशी त्याच रस्त्याने ये जा करतो. प्रतिवादी क्र.१ याच्या घरापासुन माझे घर २०० फुट अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे घर प्रतिवादी क्र.१ च्या घराला लागुन नाही. दिनांक २४.०४.२०२३ रोजी माझ्या तक्रारीवरुन महानगर पालिकेने वाद मिळकतीचा केलेला पंचनामा मी वाचला नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या पंचनाम्यामध्ये प्रतिवादी क्र.१ हा त्याच्या घराच्या उत्तरेकडील रस्त्यावर अतिक्रमण करुन बांधकाम करित असल्याचे निष्पन्न झाले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ यास त्रास देण्याच्या उद्देशाने मी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ याने वाद मिळकत विकुन तेथुन निघुन जावे याकरिता दबाव आणण्याच्या उद्देशाने मी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ याने दावा मिळकतीवर कुठलेही नवीन बांधकाम केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ याने दावा मिळकतीवरील जुने बांधकाम दुरुस्त केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे प्रतिवादी क्र.१ याला महानगर पालिकेकडुन बांधकाम परवानगी मिळण्याची आवश्यक्ता नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.२ व ३ यांना हाताशी धरुन मी वाद

मिळकतीचा खोटा पंचनामा करुन घेतला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे दस्ताऐवज व फोटोग्राफस दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकत हडप करण्याच्या उद्देशाने मी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत दाखल करण्यासाठी कुठलेही कारण घडले नाही.

**पुकारा केला असता प्रतिवादी क्र.२ व ३ तसेच त्यांचे विद्वान वकील गैरहजर सबब, उलटतपास नाही.**

फेरतपास काही नाही.

Digitally signed by NANDKISHOR HARIBHAU TIKHE
Date: 2026.01.06 17:03:02 +0530

(श्री. एन. एच. तिखे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर
(महानगरपालिका न्यायालय), औरंगाबाद

दि. ०६.०१.२०२६.